# पवारांना जयललिता यांचा पाठिंबा

## पंतप्रधानपदाचा मुद्दा : 'पवारांकडे राजकीय बुद्धिमत्ता व परिपक्वता'

**नवी दिल्ली, ता. २० (पीटीआय)** : तिसऱ्या आघाडीच्या प्रमुख आधार असलेल्या अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघमच्या प्रमुख जयललिता यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना पंतप्रधानपदासाठी पाठिंबा जाहीर केला. ''पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्याकडे आवश्यक ती राजकीय बुद्धिमत्ता व परिपक्वता आहे आणि ते पंतप्रधानपदाचे उमेदवार ठरू शकतात,'' असे जयललिता यांनी एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

''कोणत्याही नेत्याने पंतप्रधानपदासाठी माझ्याकडे पाठिंबा मागितलेला नाही,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. मायावती यांच्या पंतप्रधानपदाच्या



जयललिता



शरद पवार

उमेदवारीविषयी त्या म्हणाल्या, ''कोणत्याही व्यक्तीने पंतप्रधानपदाची इच्छा धरण्यात काही गैर नाही, असे मी आधीच सांगितले आहे. लोकशाहीत तो प्रत्येकाचा हक्क आहे.''

निवडणूक झाल्यानंतरच आपण कोणाशी आघाडी करणार ते जाहीर करू, असेही त्यांनी सांगितले. कोणताही उत्तम राजकारणी त्याचे पर्याय नेहमीच खुले ठेवत असतो, असे जयललिता आधी म्हणाल्या होत्या. त्याची आठवण करून दिल्यावर जयललिता म्हणाल्या, ''अर्थातच. या मतावर मी ठाम आहे. कोणत्याही उत्तम राजकारण्याने लवचिक असायलाच हवे.''

'शरद पवार किंवा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सरकारला पाठिंब्याचा विचार आपण करू शकतो,' असे ओरिसाचे मुख्यमंत्री व बिजू जनता दलाचे नेते नवीन पटनाईक यांनी रविवारी जाहीर केले होते. भाजपने युती तोडल्यानंतर डावे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे मित्रच आपल्या मदतीला धावून आले, याची आठवणही त्यांनी करून दिली होती.